बुराइया हर
किसी में
होती है उसे
सही करने में
वक्त जाया
कीजिए ।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ | अंक ७८ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# पीओपी मूर्तीवर पूर्णत: बंदीच्या निर्णयाने मूर्तीकार नाराज, ठोठावणार न्यायालयाचा दरवाजा

## यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असावा

गणेशोत्सवाला अद्याप सहा ते सात महिन्यांचा कालावधी असला तरी यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असावा यासाठी पालिकेने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. केवळ पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणा-्या मूर्तिकारांना यंदा मंडपासाठी परवानगी दिली जाणार आहे. यासंदर्भात एक परिपत्रकही काढण्यात आलं होतं. सार्वजनिक उत्सव २०२५ पर्यावरणपूरक पध्दतीने तसेच सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने, मूर्तीकारांना तात्पुरते मंडप उभारण्याकरीता आणि विभाग कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे मार्गदर्शनाकरिता सूचना करण्यात आल्या होत्या.

मुंबई महानगरपालिकेने आगामी गणेशोत्सवासाठी पीओपी मूर्तींवर बंदी घातली आहे. कोर्टाच्या आदेशानुसार हा निर्णय घेतला आहे. यंदाच्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या अर्थात झजझ मूर्तींना बंदी असणार आहे. माघी गणेशोत्सवाप्रमाणे आगामी सार्वजनिक गणेशोत्सवावर देखील कोर्टाच्या नियमांचे सावट आहे. कोर्टाच्या निर्णयाचा संदर्भ देत मुंबई महापालिकेकडून परिपत्रक जारी करण्यात आलं होतं. मात्र मूर्तींवर पूर्णत: बंदीच्या या निर्णयाने मूर्तीकार मात्र नाराज आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आता मूर्तीकार



संघटना न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहेत. बंदीऐवजी वेगळे पर्याय उपलब्ध करण्याची मागणी करण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या अर्थात मूर्तींवर बंदी घालण्याच्या निर्णयामुळे अनेक मूर्तिकारांचा रोजगार जाणार असल्यामुळे श्रीगणेश मूर्तिकार कामगार संघटनेने आपली बाजू मांडण्यासाठी न्यायालयात धाव घेण्याचे ठरवले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) म ूर्तींवर २०२० साली बंदी घातली होती. मात्र विविध कारणांमुळे या निर्णयाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. पण उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून १०० टक्के पीओपीबंदीचा निर्णय लागू करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला. माघी गणेश जयंती उत्सवात पीओपी गणेश मूर्तींची कुठेही विक्री होऊ देऊ नका. ती झाली असल्यास त्या गणेश मूर्तींचे विसर्जन करू देऊ नका, असे आदेश उच्च न्यायालयाने ३० जानेवारी रोजी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (एम पीसीबी), राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांना दिले होते. भाद्रपदातील गणेशोत्सवातही या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासाठी पालिका प्रशासनाने आतापासून नियोजन सुरू केले आहे. उच्च न्यायालयाच्या आणि पालिकेच्या निर्णयामुळे गणेशोत्सव मंडळेही संभ्रमात आहेत. मात्र यात सर्वात पहिला फटका पीओपीच्या मूर्ती तयार करणा-या कारागिरांना बसणार आहे. त्यामुळेच पीओपीबंदीच्या निर्णयाविरोधात आपली बाजू मांडण्यासाठी मूर्तिकारांनी पुन्हा न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. बंदीऐवजी वेगळे पर्याय उपलब्ध करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी मस्साजोगचे ग्रामस्थ पुन्हा आक्रमक, थेट सरकारला इशारा

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. याप्रकरणी सात आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे. तर दुसरीकडे या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे हा अद्याप फरार आहे. त्याला लवकरात लवकर अटक करावी आणि हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे, यांसह अन्य मागण्यांसाठी मस्साजोग ग्रामस्थांचे उद्या अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. जर दोन दिवसात दखल नाही घेतली तर पाणी सुद्धा पिणार नाही असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. तसेच शिष्टमंडळाने दखल घेतली तर आंदोलन मागे घेऊ, असेही गावक-यांनी सांगितले आहे.संतोष देशमुख हत्येप्रकरणी मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर उद्या मंगळवार २४ फेब्रुवारी २०२५ रोजी अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. या अन्नत्याग आंदोलनाला संपूर्ण गाव बसणार आहे. उद्या सकाळी १० वाजल्यापासून या आंदोलनाला सुरुवात होईल. दोन दिवस आम्ही अन्नत्याग करणार आहोत. तिस-या दिवसापासून आम्ही पाण्याचा त्याग करणार आहोत, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

धनंजय देशमुख यांची प्रतिक्रिया काय?याबद्दल धनंजय देशमुख यांच्याशी बातचीत केली असता, त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. डझ साहेबांसोबत चर्चा झाली ती सकारात्मक होती. काही गोष्टी त्यांच्यापर्यंत गेल्या नाहीत. पुन्हा चौकशी करण्यासाठी आम्ही लवकरच अर्ज देणार आहोत. गावक-यांनी जो अन्नत्यागाचा पवित्रा घेतला आहे त्याच्याशी मी सहमत आहे. जोपर्यंत शिष्टमंडळ येत नाही आम्हाला आश्वासन देत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरू असेल, असे धनंजय देशमुख म्हणाले.ङ्गतिस-या दिवसापासून आम्ही पाण्याचा त्याग करणार तर गावक-यांनीही प्रतिक्रिया दिली. ज्यांना आम्ही



सह आरोपी म्हणतो, ज्यांच्या बाबतीत सबळ पुरावे आहेत त्यांना आरोपी का करत नाहीत, असा सवाल गावक-यांनी केला. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत हा लढा सुरू राहणार. अन्नत्याग आंदोलनाला संपूर्ण गाव बसणार आहे.

# बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देण्याचा मार्ग मोकळा

बीड ।प्रतिनिधी बीड शहरासाठी जिव्हाळ्याचा असलेला पाणी प्रश्न आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांचा सर्व स्तरांवर अनेक वर्षांपासून सुरू असलेला अखंडित पाठपुरावा आणि अथक परिश्रम यांना अखेर आता यश आले आहे. ना.अजितदादा पवार यांच्याकडे याबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी न्याय मागितला आणि तो ना.अजितदादांनी दिला. बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी आणि थकीत वीजबील भरण करण्यासाठी जिल्हा नियोजन विकास निधीतून तरतूद करा. असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी जिल्हाधिकारी व बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिले आहेत. बीडला सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा योजना खूप जुनी आहे. त्यावर बीड शहराचा वाढलेला विस्तार आणि लोकसंख्या यांमुळे या सध्या कार्यरत असलेल्या योजनेतून होणारा पाणीपुरवठा हा बीड शहराच्या आवश्यकतेपेक्षा अतिशय कमी आणि अपूरा होत आहे. परंतु त्यामध्ये महत्वाची गोष्ट अशी की सध्याच्या आणि भविष्यातील बीड शहराच्या पाण्याच्या आवश्यक त्या क्षमतेची मअटल अमृत पाणीपुरवठा योजनाफ संपूर्ण काम पूर्ण होऊन तयार आहे. परंतु त्यामध्ये केवळ एकच बाब अडचणीची आणि अडसर ठरली, ती म्हणजे बीड नगरपालिकेकडे महावितरण विभागाची एकूण ४१ कोटी ७५ लाख रूपयांची वीजबिल थकबाकी आहे. आणि पहिलीच थकबाकी असल्याने नवीन योजनेला नव्याने वीज कनेक्शन महावितरण विभागाकडून दिले

# प्रवेश पूर्व शिष्यवृत्ती परीक्षेत माजलगावचा स्वराज मनोज शिनगारे दूसरा


माजलगाव : ( प्रतिनिधी ) तालुक्यातील खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड आयोजीत शालेय स्तरावरील २०२५ या वर्षीच्या सर्वात मोठी प्रवेश पूर्व शिष्यवृत्ती परिक्षेत महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयातील इयत्ता तिसरीतील विद्यार्थी स्वराज मनोज शिनगारे याने दूसरा क्रमांक पटकावला आहे. एकमेव शैक्षणिक संकुल म्हणून ओळख असलेले माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील



खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या १०० पैकी १०० गुणाच्या प्रवेशपूर्व शिष्यवृती परिक्षेत तालुक्यातील जवळपास २६५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता , इयत्ता ३ री ते ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५१ हजार रुपयांचे शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी ची हि परिक्षा आयोजीत करण्यात आली होती. चालु वर्गातील सर्व विषय व सामान्य बुद्धिमत्तेवर अधारीत तथा अतीशय पारदर्शक असलेल्या या परिक्षेत महात्मा ज्योतीबा फुले विद्यालय माजलगाव येथील तिसरी वर्गातील अतिशय होतकरू विद्यार्थी स्वराज मनोज शिनगारे याने दूसरा क्रमांक पटकावून महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालयासह माजलगाव तालुक्याच्या शिरपेच्यात भर टाकत नाव लौकिक मिळवले असता चि. स्वराज मनोज शिनगारे याचे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पायाच्या धूळ एवढे कार्य आपण करु शकलो तर जन्म सार्थकी लागेल. -रामराजे रांजवण.

माजलगाव. प्रतिनिधी- छत्रपती शिवाजी महाराज यांच्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न आपण केला पाहीजे त्यांच्या पायाच्या धुळीएवढे जरी आपण कार्य करू शकलो तर आपला जन्म सार्थकी झाल्याशिवाय राहणार नाही असे मत रामराजे रांजवण यांनी व्यक्त केले. माजलगाव तालुक्यातील आळसेवाडी येथे आयोजित शिवजयंती कार्यक्रम ाच्या अध्यक्षीय समारोप भाषणात करताना रांजवण पुढे म्हणाले की, कोणतेही काम करत असताना कोण काय म्हणेल याचा विचार न



करता ते काम आत्मविश्वासाने केले पाहिजे हा आदर्श आपण शिवाजी महाराजां कडून घेतला पाहिजे.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक कृऊबासचे माजी सभापती नितीन नाईकनवरे सह प्रवक्ते शिवश्री अमोल तौर प्रमुख पाहुणे ,मनोज जगताप युवा नेते दीपक घुबडे, उपसरपंच काशिनाथ आळसे सदस्य अशोकराव आळसे विशाल देवकते चेअरमन मल्हारी मार्तंड अर्बन,शुभम प्रधान रामेश्वर निंबाळकर बळीराम शेजुळ शिवशंभो विचार संपर्कप्रमुख यांनी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले .प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक विलास आळसे यांनी तर सुत्रसंचालन बालाजी आळसे केले व आभार विलास आळसे यांनी मानले.

# अबुधाबीमधे उभारणार छ. शिवाजी महाराजांचा पुतळा: खा. सोनवणे

## खा.बजरंग सोनवणेंच्या उपस्थितीत अबुधाबीत शिवजन्मोत्सव जल्लोषात

केजः महाराष्ट्रासह देशभरात शिवजयंती जशी उत्साहात साजरी झाली तसाच उत्साह आखाती देशातील अबुधाबीमध्ये मराठी माणसांनी दाखवून दिला. दि.२३ फेब्रुवारी रोजी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीमधे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा.सोनवणे यांनी मज्या पद्धतीने अबुधाबीमध्ये हिंदू मंदिराची स्थापना झाली, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारावा, आणि त्याचा संपूर्ण खर्च येडेश्वरी फाउंडेशन मार्फत उचलण्यात येईलफ, असा शब्द उपस्थित मराठी माणसांना दिला.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरातील विविध देशात साजरी केली जात आहे. महाराष्ट्र आणि हिंदूस्थानातील नागरिक परदेशात आता शिवजयंती साजरी करू लागले आहे. आखाती देशात स्थायिक झालेल्या नवीन मराठी पीढीला आपल्या म हाराष्ट्राची दैदिप्यमान इतिहासाची ओळख करून देण्यासाठी आतापर्यंत अनेक सामाजिक कार्यक्रम पार पाडणऱ्या इन्सायर इव्हेंटस युएई यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मागील सात वर्षांपासून उमेश नळगे पाटील, प्रदिप आघाव हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आखाती देशांमधे आयोजन करतात. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना या जयंती उत्सवाचे निमंत्रण दिले जाते. यावर्षी बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेले खा.बजरंग सोनवणे यांना प्रमुख म्हणून निमंत्रित केले आहे. त्यांच्यासोबत मालोजीराजे शाहू छत्रपती व मंत्री आयुष स्वतंत्र प्रभार आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार-ना. प्रतापराव जाधव यांचीही उपस्थिती होती. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, ज्या पद्धतीने अबुधाबीमध्ये हिंदू मंदिराची स्थापना झाली, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारावा, आणि त्याचा संपूर्ण खर्च येडेश्वरी फाउंडेशन मार्फत उचलण्यात येईल, अरब देशातील बीएपीस हिंदू मंदिर, अबुधाबी येथे अखंड हिंदूस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करणे ही अभियानाची गोष्ट



आहे. या उत्सवाच्या निमित्ताने दुबईस्थित नागरिकांनी मला सन्मानपूर्वक आमंत्रित केले. या सोहळ्यात मालोजीराजे शाहू



छत्रपती व राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांच्या सोबत सहभागी होण्याचा सन्मान लाभला ही आनंदाची गोष्ट असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय

# दिल्लीत पुन्हा महिला राज

अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्षाचा दणदणीत पराभव करून भाजपने तब्बल सत्तावीस वर्षानंतर दिल्लीत सत्ता स्थापन केली. दिल्लीत अभूतपूर्व विजय मिळवताच सर्वांना एकच प्रश्न पडला तो म्हणजे दिल्लीचे नवे मुख्यमंत्री कोण ? या प्रश्नांचे उत्तर मिळण्यास काही जवळपास तेरा दिवसांचा कालावधी लागला कारण या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. पंतप्रधान फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा आटोपून आल्यावर भाजपने दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा केली. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा करताना भाजप श्रेष्ठींनी पुन्हा एकदा धक्का तंत्राचा अवलंब करून सर्वांना अचंबित केले. भाजपने मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये धक्कातंत्र राबवून अनपेक्षित असे नवे चेहरे समोर आणून त्यांना खुर्चीवर बसवले त्याच धक्कातंत्राचा वापर करत भाजप श्रेष्ठींनी दिल्लीतही अनपेक्षित नवीन चेहरा समोर आणून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. तो नवा चेहरा म्हणजे दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री रेखा गुप्ता. वास्तविक निवडणुकीच्या आधी आणि नंतर ही रेखा गुप्ता या मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीत नव्हत्या. त्या मुख्यमंत्री बनतील असा अंदाज कोणालाच आला नव्हता. कारण मागील दोन विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. भाजप प्रवेश वर्मा यांना मुख्यमंत्री बनवतील असा कयास होता कारण प्रवेश वर्मा हे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री दिवंगत साहबसिंग वर्मा चिरंजीव. ते माजी खासदार असून दिल्लीतील प्रभावशाली नेते आहेत शिवाय त्यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केल्याने ते जायंट किलर ठरेलत. ते ज्या जाट समाजाचे आहेत त्यांची संख्या दिल्लीत लक्षणीय आहे मात्र भाजप श्रेष्ठींच्या त्यातही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मनात रेखा गुप्ता यांचे नाव होते. रेखा गुप्ता यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा वाटा आहे. संघाची पहिली पसंती रेखा गुप्ता याच होत्या कारण रेखा गुप्ता या विद्यार्थी दशेपासून संघ परिवाराशी जुळलेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. संघाने त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी जबाबदारीने पार पाडल्या. दुसरी महत्वाची गोष्ट त्या महिला आहेत. दिल्लीत मागील काही वर्षात काँग्रेस व आपने महिलांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. काँग्रेसच्या शिला दीक्षित या जवळपास पंधरा वर्ष दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. आपनेही केजरीवाल तुरुंगात गेल्यावर आतिशी या महीलेकडेच मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सोपवली. इतकेच नाही तर भाजपनेही दिल्लीत सुषमा स्वराज यांच्याकडेच मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली होती. त्यामुळे भाजपने तीच परंपरा राखत रेखा गुप्ता यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ घातली. रेखा गुप्ता या वैश्य समाजाच्या आहेत. केजरीवाल हेही वैश्य समाजाचे आहेत. मागील पंधरा वर्षापासून दिल्लीतील वैश्य समाज केजरीवालांच्या पाठीशी उभा होता. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने केजरीवालांकडे गेलेला वैश्य समाज पुन्हा आपल्याकडे वळवला आहे. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करण्यामागे आणखी एक कारण आहे. भाजप हा आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. देशातील १३ राज्यात आणि एका केंद्रशासित प्रदेशात भाजपची सत्ता आहे मात्र कोठेही भाजपने महिलेला मुख्यमंत्री पदाची संधी दिली नाही. वसुंधरा राजे या भाजपच्या शेवटच्या महिला मुख्यमंत्री होत्या. २०१३ ते २०१८ या कालावधीत त्या राजस्थानच्या मुख्यमंत्री होत्या. २०१८ नंतर अनेक राज्यात भाजपची सत्ता आली मात्र कोणत्याही राज्यात भाजपने महिलेला मुख्यमंत्री बनवले नाही त्यामुळे भाजपवर विरोधी पक्षांकडून टीका होत होती. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने ती टीका खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. नाही म्हणायला याआधी भाजपने चार महिलांना मुख्यमंत्री पदाची संधी दिली आहे. स्वर्गीय सुषमा स्वराज यांना दिल्ली, उमा भारती यांना मध्यप्रदेश, वसुंधरा राजे यांना राजस्थान तर आनंदीबेन पटेल यांना गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी बसवले होते. आता रेखा गुप्ता या भाजपच्या पाचव्या मुख्यमंत्री बनल्या आहेत. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने एकप्रकारे दिल्लीत महिला राज आणले आहे. आता रेखा गुप्ता यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. निवडणूक काळात भाजपने दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. भाजपने दिल्लीत महिलांना प्रतीमाह ३५०० रुपये रोख देण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनाला भुलून दिल्लीतील महिलांनी भाजपला भरभरून मते दिली आहेत. आता महिलांना प्रतिमाह ३५०० रुपये देतानाच दिल्लीची तिजोरी रिकामी होणार नाही याचीही काळजी त्यांना घ्यावी लागेल कारण तिजोरी रिकामी झाली तर त्याचा परिणाम विकास कामांवर होतो त्यामुळे दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करीत विकास कामे करण्याची तारेवरची कसरत त्यांना करावी लागणार आह

भ्रमणध्वनीवर बोलताना ङ्गहॅल्लोफ ऐवजी मनमस्कारफ बोलण्याची सवय स्वतः ला लावून घ्या. मगुड मॉर्निंग-गुड नाईटफ ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे

# सृष्टीचे पालनहार देवादी देव महादेव

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच शिवपार्वती आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार - पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवीदेवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र स न आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमोः शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे. शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना हर हर महादेवचा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा हर हर महादेव चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुखशांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने, हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही. देशात महाप्रलय,भुकंप,अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्याखोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा - कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.



रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर),
६३ बी शिवनगर नागपूर-९.
मो.नं.९३२५१०५७७९.

# राष्ट्रसंत भगवानबाबांनी अध्यात्म आणि समाज सुधारणेची महान कार्य केल


बीड (प्रतिनिधी) राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे अध्यात्माबरोबरच समाज सुधारण्याचे मोठे कार्य केले. मएकर विका पण शाळा शिकाफ असा मूलमंत्र देऊन त्यांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून त्यांनी समाजाला दिशा दिली. संत भगवानबाबा यांनी अध्यात्म आणि समाज सुधारण्याच्या माध्यमातून सुगंध देण्याचे कार्य केले. असे प्रतिपादन स्वररत्न भागवताचार्य वाणीभूषण ह.भ.प. अंजलीताई केंद्रे यांनी केले. बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान वर दिनांक २० फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या सर्व धर्मासमभाव अखंड हरिनाम सप्ताहात मतुम्ही संत मायबाप कृपावंत, काय पतीत कीर्ती वाणूफ, या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर भागवताचार्य तथा रामायणाचार्य स्वर रत्न ह.भ.प. अंजलीताई



केंद्रे यांनी निरूपण केले. याप्रसंगी किर्तनात बोलताना ह.भ.प. अंजलीताई केंद्रे म्हणाल्या, संतश्रेष्ठ भगवानबाबा यांचे चमत्कार अलौकिक व अगणित आहेत भाग्यवान होण्यासाठी स्वतः पुण्यवंत असावे लागते. मायबाप पुण्यवंत असतात. बाबांच्या जीवन दुःखात गेले. त्यांनी सहन ते केलं. संत हे अपमान, दुःख आणि वेदना सहन करत असतात. सहन करणे हे शिकले पाहिजे. सहन केल्याने संत देवाकडे पोहोचले. प्रत्येकाने माणूस म्हणून जगायला शिकले पाहिजे. संतांनी समाजाला दिशा दिली. त्यांनी मृत्यूवर विजय मिळविला. ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रत्येकाच्या घरी असला पाहिजे. ज्ञानेश्वरी ग्रंथ जगात सर्वश्रेष्ठ आहे. दुःख वाटून घेतल्याने समाधान आणि आनंद मिळतो. संत निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर माऊली सोपानदेव आणि मुक्ताबाई ही महाराष्ट्राची संपत्ती आहे साधू साधूत व त्यागाने माखली आहे. गुरु चरणावर भाव आणि श्रद्धा ठेवली पाहिजे. मुलं शिकावीत मुलं घडावीत. जीवन कर्तव्यभूमी आहे. प्रत्येकाने मायबापांना विसरू नये, असे सांगून अंजलीताई केंद्रे महाराज यांनी विविध दृष्टांत देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले. आपला कीर्तनातून त्यांनी आई-वडिलांचे सेवा, समाजसेवा आणि देशप्रेम याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले. गानाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ आणि वैजनाथ महाराज सानप, यांनी चाल गायन केले. मृदंगाचार्य ह.भ.प. कृष्णा महाराज सानप यांचे कीर्तनकार अंजलीताई केंद्रे यांच्यासह उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले. कीर्तनास ह.भ.प. खरमाटे महाराज, महामंडलेश्वर शिवरुद्रनंद महाराज, गो.गो. मिसाळ, बाबुराव मुंडे महाराज, बाजीराव खेडकर, अनिरुद्ध सानप, डॉ.शिवाजी सानप, डॉ. माधव सानप, तुकाराम केदार विनोद घुले, महादेव घोळवे, विलास कुटे, बाजीराव केदार, डॉ. संजय तांदळे, अशोक सानप, गणेश खाडे, उमेश फड, पत्रकार अनंत घिगे, नागरे नाना, ज्ञानोबा वायबसे, सुधाकर सानप, यांच्यासह भाविक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विपश्यना साधना कठीण कामाचा पहिला दिवस

जीवनात सगळचं चुकीचं नसतं,फक्त होकार,नकार आणि माघार कुठे घ्यावी एवढं कळायला हवं.ज्यांनी तुमची धडपड पाहिलीय फक्त त्यांनाच तुमच्या यशाची खरी किंमत कळते. इतरांना तुम्ही फक्त नशिबवान माणूस वाटत असतात.बदल हा तर निसर्गाचा नियम आहे फरक इतकाच आहे की,वेळेनुसार काहींची मने बदलतात तर काहींचे दिवस.समाजामध्ये आपली उंची ही फुटावर नाही तर विचारांवर मोजली जाते. आपले वजन हे किलोवर नाही तर शब्दांवरून मोजले जाते आणि आपली किंमत कमावलेल्या पैशांवर नाही तर कमावलेल्या माणसांवरून केली जाते.विपश्यना केलेल्या माणसांची अशीच एक आगळी वेगळी ओळख दहा दिवस साधना केल्यानंतर तयार होते. तो त्या तप्त पवन परिसरात गेला की त्याचे सर्व सुख सुविधा, मोहमाया, नाते संबंध दहा दिवसा पर्यन्त तुटतात.आणि तो वेगळ्या जगात वावरण्यास सुरवात करतो. पहिल्याच दिवशी आचार्य श्री.सत्य नारायण गोयंका गुरुजी त्या साधकांना तुम्ही कोणत्या मेहनतीने कुशल कर्म करून इथे पोचला याची महत्वाची माहिती देतात. जगात कोणतीच गोष्ट नित्य नाही. सर्वच अनित्य आहे. जे उत्पन्न होते ते नष्ट होते. कायमस्वरूपी टिकणारे असे कोणते ही काम नाही.म्हणून अशा कठीण कामावर विजय मिळविण्यासाठी इथे आला आहेत.त्यासाठी इथल्या नियमाचे पालन करा. प्रथम कठीण आर्यमौन पाळा.कोणाला ही इशाऱ्याने बोलू नका.स्वता शील पाळत नसाल तर इतरांच्या शीलाचे भंग करू नका.शील पालन केले तरच समाधी लागेल चित्त,मन शांत होऊन प्रज्ञा प्राप्त होईल.त्यासाठी आपल्या आसनावर स्थिर समाधी लावून बसले पाहिजे. मन शांत करून श्वासावर नियंत्रण करावे. प्रथम नाकपुडीतून श्वास आता घेऊन बाहेर सोडणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. ती आपण नेहमीच अनुभवतो. पण इथे ती वेगळ्या वेगळ्या प्रक्रिया करून अनुभवायची असते. मन शांत होते त्यातून शरीरावर नियंत्रण केल्या जाते त्यातूनच आपले मन व शरीर विकार मुक्त होत असते. विपश्यना (Vipassana) ही भारताची एकअत्यंत प्राचीन ध्यान- विधि आहे. मानवजाती पासून हरवलेली, आजपासून जवळजवळ २५०० वर्षांपूर्वी गौतम बुध्दाने पुन्हा शोधून काढली होती. विपश्यना शब्दाचा अर्थ असा की,जी वस्तू खरोखरच जशी आहे, ती त्याच प्रकारे जाणून घेणे. स्व-निरिक्षणाद्वारे आत्मशुद्धी करण्याची ही प्रक्रिया म्हणजे साधना आहे.



सागर तायडे,
भांडुप मुंबई,९९२०४०३८५९
लेखक: स्वतंत्र मजदूर युनियन(ILU)
महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आहेत.

# प्रधानमंत्री आवासयोजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १ लक्ष २० हजार लाभार्थींना पाहिला हप्ता वितरण

## घरकुलांचे बांधकाम गतीने होण्यासाठी प्रयत्न करणार : मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुणे येथील बालेवाडीतील प्रधानमंत्री आवास योजना कार्यक्रम नांदेडच्या शेकडो लाभार्थ्यांनी नांदेड वरून दृकश्राव्य माध्यमातून बघितला. नांदेड जिल्ह्यातील १ लक्ष २० हजार लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात आला. खासदार डॉ. अजित गोपछडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल आदींची यावेळी उपस्थिती होती.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे बालेवाडी येथे आयोजित कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र आणि १० लक्ष लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण करण्यात आले. यानिमित्ताने नांदेड



येथे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भावनात जिल्हाभरातील लाभार्थी एकत्रित आले होते. नांदेड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत एकूण एक लक्ष एकोणपन्नास हजार लाभार्थी मंजूर आहेत. त्यापैकी आज १लक्ष २० हजार लाभार्थ्यांना १५ हजारचा पहिला टप्पा बहाल करण्यात आला. त्यांच्या खात्यात थेट हा पैसा जमा झाला. यावेळी अनेक लाभार्थ्यांनी शासनाने तातडीने यासंदर्भात निर्णय घेतल्याचा आनंद व्यक्त केला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर बांधणीसाठी एक लक्ष २० हजार रुपये देण्यात येतात. त्यातील पहिला टप्पा आज १५ हजाराचा या लाभार्थ्यांना देण्यात आला. तर याच वेळी १ लक्ष ४९ हजार लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देण्यात आले उर्वरित लाभार्थ्यांना देखील हा हप्ता मिळणार असल्याचे यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले. नियोजनभवनातील या कार्यक्रमाला खासदार डॉ.अजित गोपछडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार,संजय कोडगे, सचिन उम रेकर आदीसह शेकडो लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी बालेवाडी, पुणे येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण लाभार्थ्यांना दाखविण्यात आले.

सर्वसामान्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात एक लक्ष ४९ हजार घरकुलांना मंजुरी दिली आहे. यापैकी एक लक्ष २० हजार लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत केला जात आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रधानमंत्री आवास योजना ही महत्त्वाकांक्षी योजना असून या योजनेतून ज्यांना घर मिळाले आहेत त्यांना आणखीनही सुविधा उपलब्ध केल्या जातील. प्रत्येकाच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी वेळोवेळी या योजनेचा पाठपुरावा केला जाईल. सर्व लाभार्थ्यांना याचा लाभ मिळेल कोणीही या लाभापासून वंचित राहणार नाही असेही यावेळी खासदार डॉ.अजित गोपछडे यांनी सांगितले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले गतीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून लाभार्थ्यांनीही यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी केले.यावेळी उपस्थितांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात निवडक लाभार्थ्यांना मंजुरी आदेश आणि व काही लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले.

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त बीडमध्ये प्लास्टिक मुक्त बीड अभियान संपन्न



बीड (प्रतिनिधी): संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आज बीड शहरात प्लास्टिक मुक्त बीड अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या उपक्रमाअंतर्गत भाजी मंडई व जुना मोंढा येथे प्लास्टिक कचरा संकलन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.सकाळी ८ वाजता काकू नाना मंडई येथे प्रारंभ झालेल्या या अभियानात स्वच्छता संदेश देणाऱ्या घोषणांनी वातावरण भारून गेले. आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांनी प्लास्टिक कचरा गोळा करत, नागरिकांना प्लास्टिक मुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. या वेळी उपस्थित नागरिक आणि व्यावसायिकांनी प्लास्टिक मुक्तीची सामूहिक शपथ घेतली. या अभियानाचे आयोजन इन्फंट इंडिया - आनंदग्रामतर्फे दत्ता बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम हाती घेणाऱ्या आनंदग्रामने प्लास्टिक मुक्तीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.या मोहिमेत व्यापारी महासंघ (कॅट) आणि बागवान संघटनेच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, व्यापाऱ्यांनी आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना चहा, नाश्ता आणि फळांचा पाहुणचार दिला.पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत, कार्यकर्त्यांनी नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप केले. प्लास्टिकचा वापर टाळावा आणि कापडी पिशव्या स्वीकाराव्यात, असा संदेश त्यांनी दिला.या अभियानात व्यापारी महासंघ, बागवान संघटना, सामाजिक संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण शहराने एकत्र येत दिलेला हा संदेश निश्चितच सकारात्मक बदल घडवेल.स्वच्छता हीच सेवा या गाडगेबाबांच्या तत्त्वाचा अवलंब करत, बीड शहराने प्लास्टिक मुक्ततेच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# डॉ.हनुमंत डोईफोडे यांचे उल्हासनगर येथे अपघाती निधन

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील कासारी गावचे भूमिपुत्र डॉ.हनुमंत बाबुराव डोईफोडे वय ३२ वर्षे यांचे अपघाती निधन झाले.ते सेंट्रल हॉस्पिटल उल्हासनगर येथे कार्यरत होते.दि.२३ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी हिराघाट (उल्हासनगर) येथे रात्री मोटार सायकल वर जात असताना अज्ञात टेम्पोने मोटरसायकलला जोराची धडक दिली ते गंभीर जखमी झाले यात छातीला गंभीर मार लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र उपचार सुरू असताना रात्री उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता कासारी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ.डोईफोडे यांनी एमबीबीएस पूर्ण केल्या नंतर पुढील एमडी शिक्षणासाठी उल्हासनगर येथे अडमिशन घेतलेहोते. डॉ. डोईफोडे यांच्या निधनाने कुटुंबावर व कासारी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे त्यांच्या पश्चात आई,वडील,तीन बहिणी, डॉक्टर पत्नी,आठ महिन्याचा मुलगा असा परिवार आहे





केज/प्रतिनिधी धारूर-गांजपूर-केज बस सेवा लवकरात लवकर सुरू करावी या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी प्रा.ईश्वर मुंडे सर यांनी दि.२४ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री.राजकुमार दिवटे विभागीय वाहतूक अधिकारी,बीड यांची भेट घेऊन बस सेवा सुरू करणे बाबत चर्चा केली ही बस सेवा सुरू करणे बाबतचा रस्ता पहाणी अहवाल प्राप्त झालेला असून लवकरच प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करून बस सेवा सुरू करू असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी यांनी दिले आहे.ग्रामीण भागातील ही बससेवा चालु झाल्यास प्रवाशांना याचा लाभ होणार असल्या मुळे प्रवासी समाधान व्यक्त करीत आहे.

# कांदेवाडी येथील शासकीय आश्रम शाळेत साप चावून मुलाचा मृत्यू

प्रतिनिधी ।धारूर शाळेपासून वस्तीगृहाकडे जेवणासाठी जात असताना रस्त्यात साप चावल्याने मुलाचा मृत्यू झाल्याची घटना कांदेवाडी येथील आदिवासी शासकीयआश्रमशाळेत रविवारी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडली .मुलावर उत्तरीय तपासणी करून सोमवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले .सागर पवन काळे वय ११ वर्षे असे मयत मुलाचे नाव आहे .तालुक्यातील कांदेवाडी येथे आदिवासी शासकीयआश्रम शाळा आहे .या ठिकाणी आदिवासी प्रवर्गातील गोरगरिबांची मुले येथे शिक्षण घेत आहेत .ही शाळा कांदेवाडी गावापासून पश्चीमेस डोंगरावर आहे .या ठिकाणी रविवारी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास सागर काळे हा इयत्ता पाचवी शिकणारा विद्यार्थी शाळेपासून जवळच असणाऱ्या सव्वाशे फूट अंतरावरील वस्तीगृहाकडे जेवनासाठी जात असताना त्याला साप चावल्याची घटना घडली .सोबत त्याचा एक मित्र होता त्यांनी सागर यास साप चावल्याचे पाहिले .ही घटना येथील शिक्षकाला समजतात त्यांनी दिंद्रुड येथील एका खाजगी दवाखान्यात त्यास उपचारासाठी नेण्यात आले .परंतु येथे सुविधा नसल्यामुळे त्यास माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी हलविण्यात आले .उपचार सुरु असताना सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला .दरम्यान साप चावल्याची घटना दूरध्वनीवर शिक्षकांनी पालकास देण्यात आली .सोमवारी सकाळी उत्तरीय तपासणी करण्यात आली

# भिक्षुकी करणा-या कुटुंबाला द्वारकाधीश मित्र मंडळाचा मदतीचा हात



बीड दि.२३ (प्रतिनिधी): शहरातील धोंडीपुरा भागातील ब्राह्मण समाजातील भिक्षुकी करणारे स्व.भालचंद्र कुलकर्णी यांचे काही दिवसांपुर्वी दुःखद निधन झाले होते, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती त्यांच्या हलाखीची असल्याने या कुटुंबासाठी द्वारकाधीश मित्र मंडळाने मदतीचा हात दिला आहे. स्व.भालचंद्र कुलकर्णी यांचा दहाव्या पासुन ते चौदाव्या पर्यंतच्या विधीचा सर्व खर्च व्दारकाधीश मित्र मंडळ करणार आहे. द्वारकाधीश मित्र मंडळाने केलेल्या या मदतीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे. भविष्यात ही या कुटंबाच्या मदतीसाठी द्वारकाधीश मित्र मंडळ कटिबद्ध राहील, असे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# वेश्या व्यवसायावर पथकाचा छापा
## ग्राहकाने थुंकून इशारा करताच पथकाने रेड मारली.

बीड /प्रतिनिधी आज दिनांक २४/०२/ २०२५ रोजी शिवाजी नगर येथे सह्याद्री हॉटेलचे विरुद्ध दिशेचे गल्लीत हॉटेल किनारा जवळ एक इसम मेसचे नावा खाली त्याची पत्नी व एक खाजगी इसम यांचे मदतीने त्याचे राहते घरात महीलांना बोलवुन वैश्या व्यवसाय करत असल्याची माहिति बीडच्या -क्ढण पथकाला मिळाली त्यावरून -क्ढण पथकाच्या प्रभारी अधिकारी वर्षा व्हगाडे यांनी ही माहीती वरीष्ठांना दिली. मा. पोलीस अधीक्षक यांनी ङउइ चे पोलीस निरीक्षक संतोष घोडके व -क्ढण पथकास आदेश दिल्या-नंतर रेडचे नियोजन करण्यात आले. त्यावरून दोन पंच व -क्ढण स्टाफ, डमी ग्राहक हे शिवाजीनगर नगर येथे आले व तेथे डमी ग्राहकाने थुंकून इशारा करताच पथकाने रेड मारली. त्यावेळी तेथून बीड जिल्हयातील तीन व पुणे जिल्हयातील १ महीला अशा चार महीला मिळून आल्या. तसेच आरोपी राजेंद्र प्रभाकर मुळूक वय-५०,



त्याची पत्नी ज्योती राजेंद्र मुळुक वय-३५, दोघेही राहणार शिवाजी नगर व खाजगी इसम उमेश सुनिलकुमार पारीख रा. जालना रोड, बीड यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्र्वांबर गोल्डे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके, -क्ढण पथकाच्या -झ्रख वर्षा व्हगाडे, महीला अंमलदार शोभा जाधव, अनिता दगडखैर, दिपा सावंत, शालीनी उबाळे, अनिता खरमारे मनिजा खरमाटे, सविता सोनवणे, पुरूष अंमलदार अशोक शिंदे, संजय सुरवसे सुभाष पवार यांनी केली व संबंधित दोन पुरुष आरोपी व २ महीला आरोपी यांचे विरुद्ध पोलीस ठाणे शिवाजी नगर येथे अनैतिक मानवी प्रतिबंध अधिनियम कायदया अन्यये सरकार तर्फे, -झ्रख वर्षा व्हगाडे यांनी फिर्यादी होवुन गुन्हा दाखल केला आहे

# आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्याकडून गरजू शिव सैनिक रुग्णाला एक लाखाची रोख मदत

बीड ।प्रतिनिधी हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्राचे लोकप्रिय मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या विचाराचा वारसा घेऊन आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण हे वेळोवेळी महाराष्ट्रातील गरजू रुग्णांच्या हाकेला धावून रुग्णसेवेसह युवा सेनेचे काम महाराष्ट्रभर करत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रभरातून गरजू रुग्ण वैद्यकीय



मदतीकरता बाजीराव चव्हाण यांच्या बीड येथील कार्यालयात येत असतात. असाच एक प्रत्येय बीड मधील एका शिवसैनिक असलेल्या रुग्णांच्या संबंधित दिसून आला. युवासेना तालुका प्रमुख असलेले बाबा सोनवणे यांना त्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ एक लाखाची गरज लागत होती. तेव्हा रुग्ण बाबा सोनवणे यांनी आरोग्यदूत युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण हे परळी वैजनाथ येथील युवासेना विजय दौरा टप्पा दुसरा कार्यक्रमासाठी आले होते. तेव्हा युवा सैनिक असलेले बाबा सोनवणे यांनी आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांची भेट घेऊन. आपल्या वैद्यकीय उपचारासाठी वैद्यकीय निधी लागत असल्याचे सांगितले. तेव्हा लगेच क्षणाचाही विलंब न करता आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी गरजू शिवसैनिक असलेले रुग्ण बाबा सोनवणे यांच्या उपचारकारता रोख एक लाखाची मदत देऊन पुन्हा : एकदा माणुसकीचे दर्शन घडवून दिले आहे. गरजू रुग्ण मूळचे शिवसैनिक असलेले बाबा सोनवणे यांना वैद्यकीय उपचारासाठी एक लाखाची तत्काळ रोख स्वरूपात मदत करुन शिवसैनिकांच्या पाठीशी पक्ष नेतृत्व खंबीर पणे उभे असल्याची जाणीव आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण यांनी परत एकदा करून दिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अगदी विश्वासू असलेले बाजीराव चव्हाण यांनी वेळोवेळी महाराष्ट्रातील गरजू रुग्णांच्या अडचणीकाळी धावून जाऊन त्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मदत रुपी उभे राहून माणसातल्या देवाचे दर्शन घडवून दिले आहे.

# महाशिवरात्री निमित्त पिंपळेश्वर देवस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी) सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आज मध्यरात्री देवस्थानाच्या वतीने आ. सुरेश धस यांच्या हस्ते महाभिषेक केला जाणार असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली आहे. आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून महाशिवरात्री निमित्त शहरातील पिंपळेश्वर मंदिरामध्ये महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांची रीघ लागते. महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मध्यरात्री याठिकाणी महादेवाला




महाभिषेक घालण्यात येणार असून आ. सुरेश धस यांच्या हस्ते हा महाभिषेक केला जाणार आहे. बुधवारी पहाटे ४ ते ७ यावेळेत सार्वजनिक अभिषेक पार पडल्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. शिवाय या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर यात्रा देखील या दिवशीच भरते. सायंकाळी ७ वाजता महाआरती संपन्न झाल्यानंतर मंदिरावर आकर्षक फटाक्यांची आतषबाजी केली जाणार आहे. गुरुवार दि. २७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार

## डॉ.हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात
# शिवजयंती उत्सव संपन्न



बीड (प्रतिनिधी): आज डॉ.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय सहयोग नगर बीड. येथे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर यांनी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा .शशिकांत पसारकर यांनी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगितला. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष गजानन जगताप रविंद्र देशमुख, प्रमोद कुलकर्णी तसेच या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहीलेले रविंद्र नागरगोजे, एकशिंगे सर तसेच वाचक सभासद आयुष डावकर मनोज गोले यश ताठे प्रतिक जाधव तसेच ग्रंथपाल रमाकांत शेरकर सुरेश जाडे हे उपस्थित होत

# महाशिवरात्र यात्रेनिमित्त श्रीक्षेत्र पिंपरी येथे यात्रेची जय्यत तयारी

केज (प्रतिनिधी): श्री क्षेत्र उत्तरेश्वर (हनुमंत) पिंपरी ता.केज, जि.बीड या ठिकाणी १४ वर्षाच्या वनवास काळात प्रभुराम चंद्राने स्थापन केलेले पुरातन शिवलिंग असून या ठिकाणी जटायुपक्षाची उत्तर क्रिया करतांना स्थापन केलेले शिवलिंग असल्यामुळे उत्तरेश्वर असे नामकरण झालेले आहे अशा प्रकारची अख्यायिका आहे. शिवलिंगाच्या उजव्या बाजुस एक आड (विहीर) असुन या आडात पूर्वी दरवर्षी महाशिवरात्री पर्व काळामध्ये काशीतीर्थ म्हणजे श्वेत जल यायचे असेही पूर्वजाकडून ऐकीवात आहे. श्री उत्तरेश्वर महादेव शिवलिंग हे जागृत देवस्थान असुन त्याची परिचिती अनेक भक्ताकडून



प्रत्यक्ष अनुभवात असुन या मंदिरात आजही अध्यात्मिक पावित्र्य राखणेसाठी मंदिरातील गाभाऱ्यात मक्तांना ओल्या कपड्यानेच जावे लागते तसेच ३६५ दिवस २४ तास तुपाचा नंदादिवा, दररोज दोन वेळ पुजा, सायंकाळी आरती केली जाते, विना प्रहर देखील आजतागायत चालु आहे. दर महिन्याच्या अमावासेला यात्रा भरत असून सायंकाळी बारा जोतीलिंगाची आरती होऊन किर्तन व भजनादी कार्यक्रम होत्तात या दिवशी हाजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. विसाव्या शतकातील महान संत कै.ह.भ.प. गुरुवर्य श्री ज्ञानेश्वर माऊली (दादा) उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी देखील याच शिवलिंगाची नित्यनेमाने पुजा, आराधना, ध्यान, उपासनेबरोबरच विविध अध्यात्मिक उपक्रम राबवून मंदिर जिर्णोध्दार, प्रचार, प्रसार केला होता. ग्रामीण भागातील अध्यात्मिक समाधानाचे बीड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाडयातील एकमेव ठिकाण आहे.या पावन पवित्र ठिकाणी माघ महिन्यात महा शिवरात्री पर्वकाळावर ५ दिवस मोठ्या प्रमाणात यात्रोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात साजरा होत असतो, महाशिवरात्री पर्वकाळ असून यात्रेनिमीत्त सुशोभीकरण करण्यात आले आहे त्यामध्ये संपूर्ण मंदिरास आतून बाहेरून मंदिर ट्रस्टीकडून रंगकाम करण्यात आले असून संपूर्ण मंदिरावर विद्युत रोषणाई, भाविक भक्तांना दर्शन रांगेत उनाचा त्रास होऊ नये म्हणून भव्य मंडप उभारुन त्या मंडपात दर्शन रांगेची व्यवस्था, पालखी मंडप, संपकांसाठी मंदरासमोर पालखी सोहळा व संपर्क मंडपाची उभारणी करण्यात आलेली आहे.ग्रामपंचायतचे सरपंच सचिन अशोकराव चंदनशिव, सोसायटीचे चेअरमन महेश लक्ष्मणराव चंदनशिव व त्यांचे सदस्य सहकारी यांनी गावातील सर्व पथदिवे नवीन बसवून लाईटची चोख व्यवस्था केलेली आहे. तसेच आमदार फंडातून अंडर ग्राऊंड नाल्या करुन पक्के सिमेंट रस्ते व भाविक भक्तांसाठी विविध ठिकाणी पाण्याची व्यवस्था, यात्रेचे स्वरूप मोठे असल्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये सर्व व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्राम पंचायत मार्फत मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

# बेलूऱ्यात उभारणार ५१ फुटी भगवाध्वज
## नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, बळीराम गवते यांच्या हस्ते ध्वज कामाचे भुमीपुजन

बीडः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त बेलूरा (ता.बीड) येथे पंचायत समितीचे सभापती बळीराम गवते यांच्या संकल्पनेतून ५१ फुटी भगवाध्वज उभारण्यात येत असून दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते ध्वजकामाचे भुमीपुजन करण्यात आले.

बेलूरा हे गाव श्री.क्षेत्र नारायण गडाच्या पायथ्याशी असून याठिकाणी भगवाध्वज उभारावा, अशी संकल्पना सभापती बळीराम गवते यांनी मांडली. यानूसार बळीराजा प्रतिष्ठाण आणि ग्रामस्थ कामाला लागले आहेत. आता लवकरच ५१ फुटी ध्वज याठिकाणी उभारण्यात येणार आहे. या गावाशी नारायण गडामुळे बीड जिल्हा आणि संपुर्ण राज्याचा संबंध येत आहे. याच ठिकाणाहून गडावर जावे लागते. जाणाऱ्या-येणाऱ्या भाविकांना आपला भगवाध्वज अभिमानाने फडकताना दिसावा, असा यामागचा हेतू आहे. रविवारी सायंकाळी बेलूरा येथील




तुळजाभवानी मंदिर येथे ५१ फुटी ध्वज कामाचे भुमीपुजन करण्यात आले. यावेळी सरपंच दिलीप गिरी, ग्रामसेवक वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव केदार, पांडुरंग गवते, रामनाथ गवते, भरतरी भवर, राहुल गवते, गोविंद गवते, प्रकाश लाटे, सिद्धेश्वर गवते, ज्ञानेश्वर गवते, आबासाहेब गवते, डॉग़ावडे, वशिष्ठ गवते, राजाभाऊ गवते, राहूल लाटे, अशोक गिरी, चंदू डोळस, सचिन भवर, पांडुरंग डोंगरे, नारायण गवते, विकास गवते, अक्षय गवते, विशाल गवते, अशोक लाटे, राहुल लाटे, भैय्या लाटे, बबन लाटे, दत्ता गवते, प्रवीण गवते, ऋषिकेश गवते, अमोल गवते, नितीन प्रभाळे, सुभाष गवते, हनुमान सोनवणे, अशोक सोनवणे, शिवगौरव लाटे, मारुती गवते, महादेव केदार यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

००

बेलूरा हे नारायण गडाच्या पायथ्याशी असलेले गाव आहे. गावाला धार्मिक पार्श्वभुमी असून छत्रपती शिवराय यांचे विचार तळागळापर्यंत पोहचावेत, त्यांचा भगवा ध्वज पाहून तरूणांना प्रेरणा मिळावी, अशी संकल्पना गावातील तरूणांसमोर मांडली. त्यानूसार आता ध्वज उभारणीचे काम लवकरच सुरू करत आहोत.


-बळीराम गवते, मा.सभापती, पं.स.बीड.

# कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी प्राध्यापक महासंघाच्या सहसचिव पदी प्रा.विनोद गलांडे यांची निवड



(प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विषय शिक्षक आणि महासंघाच्या बीड जिल्हा कार्यकारिणीत प्रा. विनोद गलांडे यांची बीड जिल्हा सहसचिवपदी निवड करण्यात आली. प्रा.विनोद गलांडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या राज्य कार्यकारिणीच्या वतीने मराठी विषय शिक्षक महासंघाची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बीड जिल्हाध्यक्षपदी प्रा. डॉ. अशोक देवगुडे, सचिवपदी प्रा. बिभिषण चाटे तर सह सचिवपदी प्रा. विनोद गलांडे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर नुतन कार्यकारिणीचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. विनोद गलांडे यांचा सत्कार प्रा. इंजि. उमेशजी बनसोडे, श्री.विष्णु गवई, श्री.तानाजी सोनवणे (सर) आयुष गवई, यांनी करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सत्काराला उत्तर देताना प्रा. विनोद गलांडे यांनी पुढील काळात मराठी भाषा विषयाची वाढ,विकास आणि संवर्धनासाठी व विविध मागण्यांच्या अनुषंगाने कार्य करणार असल्याचे सांगितले. बीड जिल्हा सहसचिवपदी निवड झाल्याबद्दल प्रा. विनोद गलांडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## माणिकराव कोकाटेंना तात्पुरता दिलासा,पण अपात्रतेची टांगती तलवार कायम!



मुंबई। प्रतिनिधी मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका या बनावट दस्तऐवज तयार करून लाटल्या प्रकरणात कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे व त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा नाशिक जिल्हा न्यायालयाने ठोठावली आहे. यावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहेत. त्यातच शिक्षेला आव्हान देण्यासाठी माणिकराव कोकाटे यांनी सत्र न्यायालयात अपील केले. आता माणिकराव कोकाटे यांना सत्र न्यायालयाकडून तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र, माणिकराव कोकाटे यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे. शासनाच्या सदनिका लटल्या प्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूंना दोन वर्षांची शिक्षा झाली होती. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या निर्णयाला कोकाटे यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले. याबाबत सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणीत दोन वर्षांच्या शिक्षेला न्यायालयाने अपील पिरेड पूर्ण होईपर्यंत सस्पेंड केले आणि १ लाख रुपयांच्या जामिनावर माणिकराव कोकाटे यांची मुक्तता केली. अपील पिरेड पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना शिक्षा करण्यास सत्र न्यायालयाकडून दिलासा

# १० मागण्या: १० दिवसांची डेडलाईन: ४२ मराठा संघटना एकवटल्या; सरकारला घाम फुटणार?

### हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट, बॉम्बे गॅझेटनुसार महाराष्ट्र शासनाने आरक्षणाची अमंलबजावणी करावी

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा आरक्षण आंदोलक म नोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर म नोज जरांगे पाटील अद्यापही ठाम आहेत. तर दुसरीकडे आता मराठा समाज देखील चांगलाच आक्रमक झाला आहे. कोल्हापुरात मराठा समाज संघटनांची बैठक पार पडली, या बैठकीला मराठा समाजाचे अनेक नेते उपस्थित होते. या बैठकीनंतर पुन्हा एकदा सरकारला इशारा देण्यात आला आहे. या बैठकीम



ध्ये राज्यातील तब्बल ४२ मराठा संघटना सहभागी झाल्या होत्या. मराठा समाजाच्या परिषदेसाठी दहा मार्चपर्यंत मुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडू, असा इशारा मराठा संघटनांच्या वतीनं राज्य सरकारला देण्यात आला आहे. लवकरच परभणीमध्ये मराठा समाजाची परिषद होणार आहे. सुरवातीच्या टप्प्यात सरकारसोबत चर्चेला प्राधान्य दिलं जाईल, मात्र दखल न घेतल्यास रस्त्यावरच्या लढाईचा मार्ग मोकळा असेल, असा इशारा यावेळी आंदोलक सुरेश पाटील यांनी दिला आहे. तर दुसरीकडे मनोज जरांगे पाटील आणि आमचं आंदोलन एकच असेल, मात्र आरक्षणाशिवाय अन्य काही मागण्या आम्ही करणार आहोत, मागण्या सरकारनं मान्य केल्याच पाहिजे अशी प्रतिक्रिया यावेळी आंदोलक ज्योती मेटे यांनी दिली आहे.सरकारची डोकेदुखी वाढणार? मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली, मात्र तरी देखील हा आरक्षणाचा तिढा अद्याप सुटलेला नाहीये, आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण हवं आहे, अशी जरांगे पाटील यांची मागणी आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजातून या मागणीला मोठा विरोध होत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नाचा गुंता वाढला आहे. दुसरीकडे आता मराठा समाजानं पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास अधिवेशन काळात आंदोलन करू असं म्हटलं आहे.

# जयभिम महोत्सवाच्या तयारीला सुरुवात

बीड-प्रतिनिधी बीड शहराच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाने अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन दिला आहे.त्या अनुषंगाने यंदाचा जयभिम महोत्सव साजरा करण्यासाठी शनिवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या निवड समितीच्या पहिल्याच बैठकीत तब्बल पाच लाख रुपये जमा झाले असून दीड महिना अगोदर जयभिम महोत्सवाच्या तयारीला सुरुवात झाली आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव बोधिसत्व



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती, बीड सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून साजरी केली जाणार आहे. त्यासाठी महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.यावेळी विचार मंचावर प्रा.प्रदीप रोडे, उत्तम पवार, अजय सवाई, बबन वडमारे, राजू जोगदंड, अॅड.भगवान कांडेकर, ड.राजू शिंदे, अरुणाताई आठवले, मायाताई मिसळे, अनिताताई डोंगरे आदी उपस्थित होते. या बैठकीत गेल्या वर्षीचा जमाखर्च मांडण्यात आला.तसेच सर्वानुमते २०२५ ची समिती जाहीर करण्यात आली. बैठकीच्या शेवटी विजय वाकोडे, सोमनाथ सुर्यवंशी, संतोष देशमुख दिपक अरुण यांना आदरांजली वाहण्यात आली.या महत्वपूर्ण नियोजन बैठकीचे संचलन प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले. यावेळी आंबेडकरी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. यांच्या हाती यंदाची धुरा... डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या समितीत प्रमुख म्हणून प्रा.प्रदीप रोडे, गौतम चोपडे तर सदस्य म्हणून अॅड.भगवान कांडेकर,उत्तम पवार, अॅड.राजू शिंदे,विजयकुमार समुद्रे, संतोष दिलीप गायकवाड, दयानंद सरपते, यशवंत कदम, अॅड.ओ.डी. गायकवाड, अॅड.नितीन वाघमारे, प्रा.डॉ.प्रेमचंद शिरसाट, किशोर गायकवाड, महादेव इंनकर, संतोष बामणे, विलास बामणे, सुमेध जोगदंड ,विकास वाघमारे, प्राचार्य प्रदीप गाडे, प्रा.डॉ.संजय कांबळे, वडमारे सचिन, प्रा.डॉ.उत्तम साळवे, अॅड.राजेश शिंदे यांचा समावेश आह

# आष्टीमध्ये क्लिअर मिल्क चिखली नाथचे दूध गाजल

### मालक संतोष पवार यांच्या दुधाला नागरिकांतून मोठी पसंत




आष्टी (प्रतिनिधी) आष्टी शहरातील मुर्शदपूर भागातील विनायकनगर येथील सुशिक्षित बेरोजगार नौकरीच्या मागे न लागता स्वतः चा व्यवसाय संतोष पवार यांनी आपल्या सासरवाडी चिखली नाथ या गावी जाऊन शेतीशी निगडित दूध व्यवसाय उत्तम दर्जाचा करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी क्लिअर मिल्क या नावाने म्हशीचा गोठा उभारून लोकांना कासे खालचे दूध पाजण्याच्या संकल्पामुळे आष्टीमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. आष्टी शहरात क्लिअर मिल्क या नावाने संतोष पवार चिखली नाथ येथे म्हशीच्या गोठ्याचे संगोपन करत असून १०० ग्राहकांना मोटार सायकलला दोन्ही साईडला बॅगा बसविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक एक ग्राहकांना एक लिटर काचेच्या बॉटल देतात आणि त्या सर्व बॉटल घेऊन सकाळ - संध्याकाळ आष्टी शहरात दूध घरोघरी जाऊन दूधाचे १०० ग्राहकांना ७० रूपये प्रति लिटर दूध दररोज नित्यनियमाने वाटप करत आहेत. खात्रीशिर दूध असल्यामुळे आष्टी शहरातील नागरिकांमधून आणि जनसामान्यातून क्लिअर मिल्क दूधाला मोठी मागणी वाढली आहे.पाण्याचा एक थेंब दाखवा ३६५ दिवस फुकट दूध मिळवा...संतोष पवार यांचे क्लिअर मिल्क चिखली नाथ या नावाने दूधाचे वाटप करण्यात येत आहे. कोणत्याही ग्राहकांनी दूधात पाण्याचा एकही थेंब दाखवा आणि ३६५ दिवस फुकट दूध मिळवा असे खुले आव्हान दूध ग्राहकांना पवार यांनी केले आहे. त्यांची शुद्धता आणि विश्वास या प्रामाणिक धोरणामुळे ग्राहकांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे

# राज्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेचे सातशे सोळा कोटी रुपये थकले

बीड/प्रतिनिधी राज्यात गेल्या वेळेच्या सरकारने निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना राबविल्या. आता त्या योजना बंद होत आहेत. लाभार्थी कमी होतआहेत. अशीच शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेची कथा झाली आहे.सन २०२३-२४ मध्ये राज्यात मागेल त्याला ठिबक सिंचन योजनाराबविण्यात आली. निवडणुकीनंतर आता सातशे सोळा कोटी रुपयांचा निधी थकलेला असतानाही शेतकऱ्यांना दिला जात नाही.त्यामुळे ही योजना निवडणुकी पूरती होती का ? असा आरोप जन आंदोलनाचे .अजित एम.देशमुख यांनी केला आहे. शेतकऱ्यांना अनुदानावर ठिबक सिंचन पुरविण्यात येते.जवळपास एक लाख तीस हजारावर शेतकऱ्यांना सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षात या योजनेचे लाभार्थी ठरविण्यात आले होते. केंद्र सरकारने या योजने साठी तीनशे कोटी रुपयांचे अनुदान दिले देखील.मात्र नियोजना प्रमाणे सरकारने ही योजना राबवली नाही आणि कृषी खाते यात सपशेल फेल ठरले. ज्या शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला,त्या एक लाख तीस हजार शेतकऱ्यांना आता ७१६ कोटी रुपयांचा निधी देणे आवश्यक आहे.मात्र ठिबक सिंचन योजनेतील हे अनुदान आज देखील दिले जात नाही.सरकार कडे पैसेच नसल्याचे कृषिमंत्री खात्याचे म्हणणे आहे. असे असेल तर त्या वेळेचे कृषी मंत्री आणि कृषी खात्याचे सचिव यांनी ही योजना निवडणुकीपूर्वी राबवली का ? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. मोठ्या प्रमाणात ओरड झाल्यानंतर आता सरकार ने जानेवारी २०२५ मध्ये दोनशे कोटी रुपये तर फेब्रुवारी महिन्यात १५३ कोटी रुपयांचा निधी कृषी खात्याला वर्ग केला आहे. मात्र या निधीने शेतकऱ्यांचे देणे पूर्ण होत नाही.त्यामुळे नियोजन शून्य कारभार आणि निवडणुका डोळ्यापुढे ठेवून वाटलेली खैरात, अशीच ही योजना ठरल्याचा आरोपही देशमुख यांनी केला आहे. तर दुसरीकडे गांभीर्याने विचार केला तर राज्य शासनाच्या कृषी खात्या च्या धोरणात सातत्य नसल्यामुळे सिंचन व्यवस्था कोलमडलीआहे. फळ पिकांची सिंचन व्यवस्था देखील भ्रष्टाचारात बुडालेली आहे.एकूणच कृषी खात्यावर सरकारचे नियंत्रण नसल्याने लाभार्थ्यांमध्ये देखील दलाल घुसले असून दलालांनी देखील अनेकांना लुटल्याचे समोर येत आहे.

# पुसरा फाटा येथील व्हॉलीबॉल स्पर्धेत कोळगाव संघ विजयी

### स्पर्धेत जिल्ह्यातील ४० संघाने नोंदवला सहभाग

वडवणी (प्रतिनिधी) छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्त पुसरा फाटा येथे झालेल्या जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील कोळगाव संघाने माजलगाव संघाविरुद्ध १० गुणांनी बाजी मारत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवून चषक पटकावले आहे. वडवणी तालुक्यातील पुसरा फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन शिवबा हॉलीबॉल हिवरगव्हाणपुसरा संघाच्या वतीने केले होते. स्पर्धे चे उद्घाटन नगराध्यक्ष शेषेराव जगताप, संजय आंधळे, जि.प. सदस्य औदुंबर सावंत, रा.काँ. तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, अमरसिंह मस्के, सचिन लंगडे, संतोष डावकर, नागेश डिगे, महादेव नाईकवाडे, नंदु नाईकवाडे, सरपंच बंडू नाईकवाडे, महादेव सावंत, डॉ. ताकट, अंकुश नाईकवाडे, आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील ४० संघानी सहभाग घेतला होता. अंतिम सामना गेवराई तालुक्यातील कोळगाव संघ व माजलगाव संघ यांच्यामध्ये झाला. चुरशीच्या सामन्यामध्ये कोळगाव संघाने १० गुणांनी विजय मिळवून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवून चषक पटकाविल. या संघाला १५ हजार रुपये रोख रक्कम व चषक देवून गौरविण्यात आले. प्रथम पारितोषिक जिल्हा परिषदेचे माजी सभापती जयसिंग सोळंके यांच्या वतीने देण्यात आले होते. द्वितीय पारितोषिक माजलगाव संघाने पटकावले असून द्वितीय पारितोषिक माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत व आनंद काळे यांच्या वतीने देण्यात आले होते. तर तृतीय पारितोषिक आष्टी संघाने पटकावले असून हे पारितोषिक भाजपाचे युवा नेते संजय आंधळे यांच्यावतीने देण्यात आले. चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक नांदुर संघाने पटकावले हे पारितोषिक मोरवड सरपंच विवेक आंडिल यांच्या वतीने देण्यात आले. पाचवे पारितोषिक माळेगाव संघाने पटकावले हे बक्षीस शिवसेना पक्षप्रमुख उबाठा गटाचे तालुकाप्रमुख विनायक मुळे यांच्या वतीने देण्यात आले. सहावे पारितोषिक चिंचवण संघाने पटकावले असून हे बक्षीस सचिन लंगडे यांच्या वतीने देण्यात आले. सातवे पारितोषिक नित्रुड संघाने पटकावले असून हे पारितोषिक बंटी माळी यांच्या वतीने देण्यात आले. तर आठवे पारितोषिक वडवणी संघाने पटकावले असून हे पारितोषिक राहुल टकले यांच्या वतीने देण्यात आले तर नववे पारितोषिक श्रीमंतयोगी नित्रुड संघाने पटकावले असून हे पारितोषिक प्रदिप बहीरे यांच्यावतीने देण्यात आले. तर दहावे पारितोषिक राजमाता संघाने पटकावले असून हे बक्षीस भाऊसाहेब जाधव यांच्या वतीने देण्यात आले. असे दहा पारितोषिक देऊन व्हॉलीबॉल संघाचा गौरव करण्यात आला आहे. यावेळी हॉलीबॉल संघाला जर्सीची व्यवस्था भाजपा युवा नेते अमरसिंह मस्के यांच्या वतीने करण्यात आली होती. तर बेस्ट शुटर श्रीराम नाईकवाडे, बेस्ट नेटर चेअरमन महादेव नाईकवाडे, शिस्तबद्ध संघ नंदू नाईकवाडे, उत्कृष्ट संघ अंकुश नाईकवाडे, नेट बॉल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष बजरंग साबळे,भोजन व्यवस्था सरपंच बंडू नाईकवाडे, सरपंच रामराव सावंत, मंडप व्यवस्था दत्ता ढवळे, लाईट जनरेटर भास्कर गायकवाड,पाणी व्यवस्था शिवम सावंत, तर या स्पर्धेला विशेष सहकार्य



म्हणून भागवत सावंत, बालाजी दराडे, सचिन सानप, हरिभाऊ पवार, शिवाजी तौर, डॉ.विशाल ताकट, कुणाल मुंडे, राहुल चिंचकर, भागवत नाईकवाडे, गोरक्षनाथ नाईकवाडे, दिलीप शेंडगे, महादेव सावंत, भाऊसाहेब जाधव, प्रमेश्वर मस्के, ईश्वर नाईकवाडे, कैलास नाईकवाडे, राहुल बहिरे, मच्छिंद्र सावंत यांनी विशेष सहकार्य केले आहे. या स्पर्धेचे आयोजन पत्रकार अविनाश मुजमुले आणि शिवबा व्हॉलीबॉल संघ हिवरगव्हाण- पुसरा यांच्यावतीने करण्यात आले होत

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com